# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/११०/१८८

ईमेल: secretary@msbte.com संकेतस्थळ : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F१/२०२२/ 09 दिनांक – 28 APR 2022

**महत्त्वाचे परीपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम
तसेच औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

**विषय: उन्हाळी परीक्षा – २०२२ च्या आयोजनाबाबत...**

संदर्भ: १) मंडळाचे सम सत्राचे शैक्षणिक वेळापत्रक परिपत्रक क्र. MSBTE/D-40/EvenSem/Academic Calender/2021/007, Dt. 21/01/2022

२) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/परीक्षाविभाग/F१/२०२२/०५३, दि. ०४/०४/२०२२

३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. बैठक-२०२२/प्र.क्र.१२५/विशि-३. दि. २७/०४/२०२२

उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र. १ द्वारे मंडळामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील समसत्राकरीता शैक्षणिक वेळापत्रक दि. २१/०१/२०२२ रोजी जाहीर करण्यात आले होते. तसेच संदर्भीय परिपत्रक क्र. २ नुसार उन्हाळी परीक्षा – २०२२ च्या आयोजनाबाबत सविस्तर कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ३ नुसार महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षेसंदर्भात मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंसमवेत दि. २५/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झाले आहे. सदर बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मंडळाद्वारे घेण्यात येणा-या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम तसेच औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था, विद्यार्थी व त्यांच्या पालकांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे-

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त तसेच औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमातील सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची उन्हाळी – २०२२ लेखी परीक्षा प्रचलित पद्धतीने (offline mode) लागू असलेल्या मंडळाच्या Teaching Examination Scheme नुसार दि. ०८ जून ते २८ जून, २०२२ या दरम्यान घेण्यात येतील.

२. उन्हाळी – २०२२ परीक्षेकरीता मंडळाने जाहीर केलेल्या परीक्षेच्या वेळापत्रकात नियमित सत्र/वर्षातील प्रत्येक विषयाच्या लेखी परीक्षेच्या दोन पेपरदरम्यान किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात आले आहे.

३. लेखी परीक्षेसाठी प्रत्येक तासाला १५ मिनिटे वेळ वाढवून देण्यात आला आहे. सदर सुविधा फक्त उन्हाळी परीक्षा – २०२२ करीता लागू राहील.

४. मंडळामार्फत यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमधील विषयनिहाय प्रश्नपत्रिका तसेच विषयनिहाय नमूना प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना Suggestive Question Bank म्हणून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. उन्हाळी परीक्षा – २०२२ करीता त्या धर्तीवर विद्यार्थ्यांनी सराव करून परीक्षेसाठी तयारी करणे अपेक्षित आहे.

संस्थेच्या प्राचार्यांनी सर्व सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षा – २०२२ करीता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करून द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत मार्गदर्शन करावे. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीस्तव –
मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता –
१. प्राचार्य, पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व स्वायत्त संस्था
२. उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय – मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद